डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर
इतिहास विभाग, राज्यशास्त्र विभाग आणि डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग
विशेष व्याख्यानाचा अहवाल

दिनांक : २ नोव्हेंबर २०२६

विषय : 'पिछड़े समुदाय का अम्बेडकरी आंदोलन में सहभाग'

प्रमुख वक्ता- प्रो. डॉ. श्यामलाल (माजी कुलपती राजस्थान विश्वविद्यालय)

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती संचालित डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर येथील इतिहास, राज्यशास्त्र आणि डॉ. आंबेडकर विचारधारा विभागांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २ नोव्हेंबर २०२६ रोजी 'पिछड़े समुदाय का अम्बेडकरी आंदोलन में सहभाग' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात राजस्थान विश्वविद्यालयाचे माजी कुलपती प्रा. डॉ. श्यामलाल प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. भुवनेश्वरी मेहेरे होत्या.

प्रा. श्यामलाल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक विचारांचे विश्लेषण करत आंबेडकरी चळवळ ही सर्व शोषित, वंचित व मागासवर्गीयांच्या सक्षमीकरणाची व्यापक चळवळ असल्याचे सांगितले. तसेच वाल्मिकी समाजाच्या सहभागाचा उल्लेख करून विद्यार्थ्यांनी समता, न्याय व बंधुतेची मूल्ये स्वीकारण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. भुवनेश्वरी मेहेरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी असल्याचे सांगितले. बाबासाहेबांनी समाजातील सर्व घटकांना सामाजिक न्याय, समान संधी आणि मानवी प्रतिष्ठा मिळावी यासाठी आयुष्यभर संघर्ष केला असे मत मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख डॉ. अविनाश फुलझेले यांनी केले. त्यांनी फाळणीनंतर स्थलांतरित अस्पृश्य समाजाच्या समस्या आणि त्या सोडविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. आंबेडकर विचारधारा विभागप्रमुख डॉ. शिल्पा मेश्राम यांनी केले, तर राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. विद्या चौरपगार यांनी आभार प्रदर्शन केले. या प्रसंगी डॉ. शैलेश बहादुरे, डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. मिलिंद खेळकर, डॉ. शंकर चांदेकर, डॉ. मनोज अंद्रसकर, डॉ. त्रिपाठी, डॉ. उत्पल डोंगरे, डॉ. रोहिणी मेश्राम, प्रा. प्रिया वानखडे, प्रा. विधीशा ढोके, प्रा. स्वाती देवकर, प्रा. अंकित बनपुरकर, प्रा. दिलीप राठोड, प्रा. बापू शेंडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद आणि बी.ए. अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची नोटिस

डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर -१०

सूचना

दिनांक : ३०/१०/२०२६

कला शाखेतील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, इतिहास, राज्यशास्त्र व डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०२-११-२०२६, सकाळी ११.३० वाजता रूम नंबर ०१ येथे प्रा. श्याम लाल, माजी कुलगुरू, राजस्थान विश्वविद्यालय, जयपूर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. बी. ए. मेहेरे असतील.

करिता कला शाखेतील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी सदर कार्यक्रमास वेळेवर उपस्थित राहावे.

(डॉ. सौ. भुवनेश्वरी मेहेरे)
PRINCIPAL
DR. AMBEDKAR COLLEGE
NAGPUR.

कार्यक्रमाचे पोस्टर्स





कार्यक्रमाची क्षणचित्रे





















कार्यक्रमाच्या वर्तमान पत्रातील बातम्या

मंगळवार ०३ नोव्हेंबर २०२६

Tuesday 03 November 2026

आंबेडकरी चळवळीने वंचितांना दिली सामाजिक परिवर्तनाची दिशा : प्रा. श्यामलाल

नागपूर : आंबेडकरी चळवळ ही केवळ एका समाजापुरती मर्यादित नसून देशातील मागासवर्गीय, शोषित आणि वंचित घटकांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरणाची व्यापक चळवळ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मानवी मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीची दिशा दिली, असे प्रतिपादन राजस्थान विद्यापीठाचे माजी कुलपती प्रा. डॉ. श्यामलाल यांनी केले.

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती संचालित डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी येथे इतिहास, राज्यशास्त्र आणि डॉ. आंबेडकर विचारधारा विभागांच्या संयुक्त विद्यमाने 'पिछड़े समुदाय का अम्बेडकरी आंदोलन में सहभाग' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भुवनेश्वरी मेहेरे होत्या.

प्रा. श्यामलाल यांनी स्वतंत्र मजूर पक्ष आणि शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशनच्या माध्यमातून बाबासाहेबांनी विविध वंचित व मागासवर्गीय समाजघटकांना संघटित करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. आंबेडकरी



चळवळीमुळे उपेक्षित समाजघटकांमध्ये राजकीय नेतृत्व निर्माण झाले. विद्यार्थ्यांनी जातीय विषमतेच्या पलीकडे जाऊन समतावादी विचारांचा स्वीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. भुवनेश्वरी मेहेरे यांनी बाबासाहेबांचे कार्य संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी होते. सामाजिक न्याय, समान संधी आणि मानवी प्रतिष्ठेसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला, असे सांगितले.

प्रास्ताविकात इतिहास विभागप्रमुख डॉ. अविनाश फुलझेले यांनी फाळणीच्या काळातील अस्पृश्य निर्वासितांच्या समस्या सोडविण्यासाठी बाबासाहेबांनी दादासाहेब गायकवाड आणि पी.एल. जाधव यांच्यावर सोपविलेल्या जबाबदारीचा ऐतिहासिक संदर्भ मांडला. स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन आणि भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून विविध वंचित घटकांना परिवर्तनाच्या प्रवाहाशी जोडण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. संचालन डॉ. शिल्पा मेश्राम यांनी केले, तर आभार डॉ. विद्या चौरपगार यांनी मानले. यावेळी डॉ. शैलेश बहादुरे, डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. मिलिंद खेळकर, डॉ. शंकर चांदेकर, डॉ. मनोज अंद्रसकर, डॉ. त्रिपाठी, डॉ. उत्पल डोंगरे, डॉ. रोहिणी मेश्राम, प्रा. प्रिया वानखडे, प्रा. विधीशा ढोके, प्रा. स्वाती देवकर, प्रा. अंकित बनपुरकर, प्रा. दिलीप राठोड, डॉ. बापू शेंडे यांच्यासह प्राध्यापक आणि बी.ए.चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Page Number: 4
Edition Category: Nagpur Edition
Edition Date: 03 Nov 2026
Website Name: Bahjuan Saurabha

'आंबेडकरी चळवळ ही सक्षमीकरणाची'

नागपूर : आंबेडकरी चळवळ ही केवळ एका समाजघटकापुरती मर्यादित नसून देशातील मागासवर्गीय, शोषित आणि वंचित घटकांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरणाची व्यापक चळवळ होती, असे प्रतिपादन राजस्थान विश्वविद्यालयाचे माजी कुलगुरू डॉ. श्यामलाल यांनी केले.

दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या इतिहास, राज्यशास्त्र आणि डॉ. आंबेडकर विचारधारा विभागांच्यावतीने 'मागासवर्गीय समाजाचा आंबेडकरी चळवळीतील सहभाग' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. भुवनेश्वरी मेहेरे होत्या.



प्रा. श्यामलाल यांनी आपल्या व्याख्यानात आंबेडकरी चळवळीतील विविध घटकांचा आढावा घेतला. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीमुळे उपेक्षित समाजघटकांमध्ये राजकीय नेतृत्व निर्माण होण्याची प्रक्रिया सुरू झाली, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. भुवनेश्वरी मेहेरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य देशातील संपूर्ण समाजाच्या कल्याणाशी निगडित असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख डॉ. अविनाश फुलझेले यांनी केले आणि आंबेडकरी चळवळीशी संबंधित विविध ऐतिहासिक संदर्भ सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. आंबेडकर विचारधारा विभागप्रमुख डॉ. शिल्पा मेश्राम यांनी केले, तर राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. विद्या चौरपगार यांनी आभार मानले.

या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद आणि बी.ए. अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उपस्थिती पत्रक





